संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# संपादकीय

# नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# बोगस विद्यापीठांचे आश्रयदाते कोण?

**सरकारी** कारभारात कशी अंदाधुंदी असते हे अनेक उदाहरणांवरून वेळोवेळी समोर येतेच. परंतु आरोग्य, शिक्षण, गृह किंवा संरक्षण यासारख्या क्षेत्रात जेव्हा हा गलथानपणा पाहायला मिळतो त्यावेळी कोणत्याही संवेदनशील माणसाला धक्का बसल्याशिवाय राहत नाही. पैसा कमावण्यासाठी कशा कशा प्रकारे लोकांची फसवणूक होईल याचा कोणताही नेम नाही. बोगस नोटा, बोगस डॉक्टर्स, बनावट औषधे, तोतये पोलीस अधिकारी, बोगस पदवीप्रमाणपत्र असे अनेक प्रकार घडतात. विनापरवानगी प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा सुरू राहण्याचे प्रकारही घडून येतात. परंतु चक्क बोगस विद्यापीठं वर्षानुवर्षे कार्यरत राहतात. तरी त्याचा केंद्र आणि राज्य सरकारला थांगपत्ता लागत नाही. म्हणजे गलथानपणाचा हा अतिरेकच म्हणावा लागतो. अलिकडेच लोकसभेत सरकारने दिलेल्या माहितीप्रमाणे देशात तब्बल २१ बनावट विद्यापीठं आहेत. ज्यात सर्वाधिक म्हणजे आठ विद्यापीठं दिल्लीत आहेत. याखालोखाल उत्तर प्रदेशात चार, आंध्रप्रदेश, केरळ, पश्चिम बंगाल याठिकाणी प्रत्येकी दोन विद्यापीठं तर कर्नाटक, महाराष्ट्र आणि पाँडेचेरी या राज्यात प्रत्येकी एक विद्यापीठ बोगस असल्याचे समोर आले आहे. ही विद्यापीठं बंद करण्याच्यादृष्टीने त्या त्या राज्यांना निर्देश दिला असल्याचे केंद्रीय मंत्र्यांनी सांगितले. हा प्रकार आताचाच आहे असेही नाही. अगदी २००४ ते २०१४ या काळात पाच विद्यापीठं बंद केली गेली. तर २०१४ ते २४ या काळात बारा विद्यापीठांना टाळे ठोकले गेले. या बोगस किंवा बनावट विद्यापीठांबाबत सरकारने केलेल्या कारवाईचा जरी उल्लेख होत असला तरी मुळात अशी विद्यापीठं अस्तित्वातच कशी येतात आणि अनेक वर्षे ती चालू कशी राहतात. त्यासंदर्भात त्या त्या विभागातल्या लोकप्रतिनिधींना, शिक्षण अधिकाऱ्यांना त्या त्या राज्यातल्या मंत्र्यांना कोणतीच माहिती मिळू नये हे आणखीनच आश्चर्यकारक ठरते. याचा सरळ अर्थ असाही होतो की सरकारी प्रक्रिया डावलून म्हणजेच सरकारची कोणतीच आर्थिक मदत न घेता खासगी स्तरावर अशा शिक्षण संस्था आणि विद्यापीठं सुरू होतात. त्याकडे कोणाचेही गांभीर्याने लक्ष जात नाही.

**नेमके कोणाचे पाठबळ**

देशभरात तब्बल २१ बोगस विद्यापीठं कार्यरत राहतात आणि त्यांच्यावर तातडीने कोणतीही कारवाई होत नाही. शिक्षणक्षेत्रासारख्या विशेषतः विद्यापीठ स्तरावर जिथे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची निश्चिती होत असते. तिथे चालणारा सरकारचा हलगर्जीपणा अत्यंत धक्कादायक ठरतो. अनेक वर्षे बिनबोभाटपणे ही विद्यापीठं सुरू राहतात. सरकारच्याच आकडेवारीप्रमाणे २०१४ ते २४ या काळात बारा विद्यापीठं बंद केली गेली. पण त्याच काळात पुन्हा नऊ बोगस विद्यापीठं नव्याने अस्तित्वात यावी हे आणखीनच आश्चर्यकारक ठरते. म्हणजे सरकारी कायद्याचा, नियमाचा किंवा शिक्षण खात्याचा कोणताही धाक, वचक या बोगस विद्यापीठ संस्थापकांवर नाही हे सिद्ध होते. यातून एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे कोणते विद्यापीठ अस्तित्वात येते त्यावेळेला त्यासाठी काही एकर जागा किंवा इमारतींसाठी कोट्यवधींचा खर्च होतो आणि विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्या दुप्पट-तिप्पट देणग्या आणि फी वसूल केली जात असते. म्हणजेच कायद्याला धाब्यावर बसवून कमी वेळात पैसे कमावण्याची ही बोगस विद्यापीठांची दुकानदारी बिनधास्तपणे सुरू राहते. त्यावेळी त्याला निश्चितच कोणाचा ना कोणाचा तरी आशीर्वाद असल्याशिवाय ही दुकानदारी चालू शकत नाही. विशेषतः राजकीय पाठबळ किंवा अभय असल्याशिवाय हा विद्यापीठांचा बोगस कारभार चालू राहू शकत नाही हेदेखील तितकेच खरे आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा प्रकार ठरतो. सरकारने शिक्षण क्षेत्रात विनाअनुदान तत्त्व स्वीकारल्यापासून या बोगस शिक्षण संस्थांचा सुळसुळाट झालेला आहे. त्यात पुन्हा खासगी विद्यापीठं स्थापन करायलादेखील परवानगी दिली जाते. एवढेच नव्हे तर त्यांना अनेक प्रकारची स्वायत्तताही बहाल केली जाते. स्वायत्ततेच्या नावाखाली चालणारा त्यांचा स्वैराचार शिक्षण क्षेत्रातला सर्वात मोठा अत्याचारच म्हणावा लागतो. बोगस विद्यापीठांची माहिती समोर आल्यावर त्याच्यावर कारवाई करणे यात विशेष काही नाही. महाराष्ट्रात नागपूरमध्ये अरेबिक युनिव्हर्सिटी नावाचे बोगस विद्यापीठ सुरू होते. उपमुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात ही दुकानदारी कशी काय चालू राहिली. आणि विरोधी पक्षही कसा काय शांत होता असे अनेक प्रश्न निर्माण होतात.

**दुर्लक्ष करणाऱ्यांवर काय कारवाई ?**

आता ही विद्यापीठं कशी अस्तित्वात येतात. त्यांची कार्यपद्धती म्हणजेच मोडस ऑपरेंडी कशी असते. सरकारी यंत्रणांनाही गुंगारा देऊन त्यांचा कारभार कसा काय सुरू राहतो हादेखील एक संशोधनाचा विषय ठरतो. केंद्राने आता त्या त्या राज्य सरकारांना अशा बोगस विद्यापीठांविरोधात कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. आता ती कारवाई झाली की नाही. झाली तर काय स्वरूपाची झाली. याचा पाठपुरावा केंद्र सरकार कशा पद्धतीने करणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशी विद्यापीठं अस्तित्वात आल्याबद्दल कोणाला नेमके जबाबदार धरले जाते हेसुद्धा लोकांना समजले पाहिजे. संबंधित विद्यापीठांवर कारवाई करून ते बंद करण्याची प्रक्रिया भलेही होत असेल. परंतु या सगळ्या बेकायदेशीर कारभाराकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणतीच कारवाई होत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. त्या त्या जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांना आपल्या जिल्ह्यात कोणकोणत्या शिक्षण संस्था आहेत याची खडान्‌खडा माहिती पाहिजे. विनापरवानगी किंवा बोगस स्वरूपात शिक्षण संस्था सुरू नाहीत ना याचीदेखील त्यांनी माहिती घेतली पाहिजे. निदान त्या त्या जिल्ह्यात अधिकृत कोणकोणत्या संस्था आहेत याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. वर्तमानपत्रातल्या जाहीरातीतून किंवा शिक्षण विभागाच्या वेबसाईटवर या अधिकृत संस्थांमध्येच प्रवेश घेण्याचा सल्ला दिला गेला पाहिजे. या बोगस विद्यापीठांचे नेमके कोणकोण आश्रयदाते आहेत, याचा शोध घेऊन त्यांच्यावरही कारवाई होणे तितकेच आवश्यक ठरते. जोपर्यंत अशा कठोर कारवाया होत नाहीत, तोपर्यंत ही दुकानदारी अशीच चालू राहील.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**आपले विचार कितीही चांगले असले तरी ते तेव्हाच सार्थकी लागतात. जेव्हा ते आपल्या व्यवहारातून लोकांना दिसतात.**

## पंचांग



**बुधवार, १८ डिसेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**
**मार्गशीर्ष कृष्ण तृतीया**
**नक्षत्र : पुष्य**

**रवी उदय- ०७-०७**
**रवी अस्त- १८-०४**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ते २४-०० कर्क**

**संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री ९.०३**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)
**ॲडव्हान्टेज रहेजा हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | ॲडव्हान्टेज रहेजा हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | ०९ जून, २००८ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्र. | U55101MH2008PTC183335 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ४ था मजला, रहेजा चेंबर्स, लिंकिंग रोड आणि मेन ॲव्हेन्यू, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५४. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | १७ डिसेंबर, २०२४ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | १५ जून, २०२५ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | नावः जयेश नटवरलाल संघराजका नोंदणीकरण क्रमांकः IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | नोंदणीकृत पत्ताः ४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी. एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४. ईमेल आयडीः jayesh.sanghrajka@incorpadvisory.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | पत्रव्यवहाराचा पत्ताः इनकॉर्प रिस्ट्रक्चरिंग सर्व्हिसेस एलएलपी ४०५-४०७, हिंद राजस्थान बिल्डींग, डी. एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई ४०००१४. पत्रव्यवहाराचा ईमेल आयडीः cirp.advantagerahejahotels@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३१ डिसेंबर, २०२४ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६ए)च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गातील तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः | अ) दावा अर्ज डाऊनलोड करण्याकरिता वेब लिंक www.ibbi.gov.in/downloadforms.html ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी आदेश क्र. सीपी (आयबी) क्र. ५१/एमबी/२०२४ दिनांक १७ डिसेंबर, २०२४ नुसार दि. १७ डिसेंबर, २०२४ रोजी ॲडव्हान्टेज रहेजा हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
ॲडव्हान्टेज रहेजा हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ३१ डिसेंबर, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
*दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.*

जयेश नटवरलाल संघराजका
ॲडव्हान्टेज रहेजा हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणामध्ये अंतरिम ठराव व्यावसायिक
नोंदणी क्रमांकः IBBI/IPA-001/IP-P00216/2017-2018/10416
एएफए क्र. AA1/10416/02/311225/107388 दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत वैध
दिनांकः १८ डिसेंबर, २०२४
ठिकाणः मुंबई



# रोहित, विराट या ज्येष्ठांचा फ्लॉप शो सुरुच
# तळाच्या फलंदाजांनी फॉलोऑन वाचविला



गाब्बा

**भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४४५ धावा केल्यानंतर भारताची चौथ्या दिवसारवेर ९ बाद २५२ अशी स्थिती करून टाकली. राहुल ८४ आणि जडेजा ७७ हे दोघे सोडले तर भारतीय फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही. कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट कोहली यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. पण तिसऱ्या कसोटी सामन्यातही त्यांचा फ्लॉप शो सुरूच राहिला. दरम्यान तळाच्या फलंदाजांनी फॉलोऑन वाचविला. तसेच पावसामुळे वेळ वाया गेल्याने भारताला पराभव टाळण्याची संधी मिळू शकते.**

**ऑस्ट्रेलियाने** पहिल्या डावात स्मिथचे शतक, हेडचे दीड शतक आणि केरीच्या ७७ धावांच्या जोरावर पहिल्या डावात ४४५ अशी मजबूत धावसंख्या उभारली. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात बुमराहने अप्रतिम गोलंदाजी करीत ७६ धावांमध्ये ६ बळी घेतले. सिराजने २ बळी घेतले पण, इतर गोलंदाजांना मात्र अपयश आले. मात्र त्याच खेळपट्टीवर भारताच्या पहिल्या डावात ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केली.

स्टार्कने भारताचा सलामीचा फलंदाज जैस्वालला ४ धावांवर बाद केल्यानंतर स्टार्कने शुभमन गिल यालाही १ धावेवर बाद केले. तर हेजलवूडने विराट कोहलीला ३ धावांवर तंबूचा रस्ता दाखवला. ऋषभ पंत सुद्धा ९ धावांवर कमिन्सच्या गोलंदाजीवर बाद झाला. कर्णधार रोहित शर्माचा फ्लॉप शो सुरूच आहे. वास्तविक मधल्या फळीची पडझड झाल्यानंतर रोहितने अत्यंत जबाबदारीने खेळायला हवे होते. मात्र कमिन्सने त्याला १० धावांवर तंबूचा रस्ता दाखवला. पण सलामीवीर के. एल. राहुल याने मात्र आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली. एका बाजूने धडाधड विकेट पडत असताना दुसऱ्या बाजूने राहुलने किल्ला लढवला. पुढे त्याला जडेजाची उत्तम साथ लाभली. राहुलने ८४ तर जडेजाने ७७ धावांची उपयुक्त खेळी केल्यामुळेच भारताला अडीचशेचा टप्पा गाठता आला. त्यानंतर सिराज १ तर रेड्डी १६ धावांवर परतला. अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे बराच वेळ वाया गेला. चौथ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या ९ बाद २५९ धावा झाल्या होत्या. बुमराह १० तर आकाशदीप २७ धावांवर खेळत आहेत. स्टार्कने ३ तर कमिन्सने २ बळी घेतले.

## विश्वविजेता बुद्धिबळपटू गुकेशचे चेन्नईत जोरदार स्वागत

चेन्नई

**विश्वविजेता** बुद्धिबळपटू डोम्माराजू गुकेश याचे सोमवारी चेन्नईमध्ये जोरदार स्वागत झाले. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या



चाहत्यांसह तामिळनाडू राज्य सरकार आणि राष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाच्या अधिकाऱ्यांनी गुकेशचे जल्लोषात स्वागत केले.

१८ वर्षीय गुकेशने गेल्या आठवड्यात सिंगापूर येथे चीनच्या डिंग लिरेनला नमवून सर्वांत कमी वयाचा विश्वविजेता म्हणून मान मिळवला. त्याने यासह दीर्घकाळापासून सुरू राहिलेला रशियाच्या गॅरी कास्पारोव्ह यांचा विश्वविक्रमही मोडला. कास्पारोव्ह याने १९८५ मध्ये वयाच्या २२व्या वर्षी विश्वविजेतेपद पटकावले होते. मायदेशी परतल्यानंतर गुकेशने आपल्या पाठीराख्यांचे आभार मानले. चेन्नई विमानतळावर प्रसारमाध्यमांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कॅरम स्पर्धेत माजी विश्वविजेते पराभूत

**मुंबई** - महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आयोजित आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ पुरस्कृत दुसऱ्या महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफी स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत महाराष्ट्राच्या सुपेश कामतेकरने महाराष्ट्राच्या माजी विश्वविजेत्या प्रशांत मोरेवर २२-१८, ५-२३, २०-१२ तर साजिदने योगेशवर ३-१६, १९-१३, १५-१० विजय मिळवला.

## आजचे राशी भविष्य

बुधवार, दि. १८ डिसेंबर २०२४
ज्योतिषपंडीत अर्चना तारू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | चिकित्सकपणा वाढेल. कृतीशील रहाल. आर्थिक लाभ होतील. मनातले विचार बदलतील. |
| वृषभ | इतरांच्या सल्ल्यावरून आर्थिक गुंतवणूक करू नका; फसवणूक होण्याची शक्यता. आरोग्याची काळजी घ्या. |
| मिथुन | घरसजावटीसाठी खरेदी होईल. प्रेमीजनांसाठी अनुकूल दिवस. प्रवासाचे योग आहेत. |
| कर्क | कार्यक्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडतील. कामानिमित्त प्रवास होतील. जोडीदाराच्या सहकार्याचा फायदा होईल. |
| सिंह | आदरातिथ्य करण्याची संधी लाभेल. जागाजमिनीच्या माध्यमातून पैशाची आवक होईल; खर्चही वाढेल. कागदपत्रे नीट सांभाळा. |
| कन्या | एकाचवेळी अनेक गोष्टी करण्याकडे कल राहील. श्रमाचे चीज होईल. आर्थिक प्राप्ती चांगली राहील. |
| तूळ | नियमांचे पालन करा. खाण्यापिण्याचे पथ्य सांभाळा. भावंडांचे सौख्य लाभेल. घरात चैनीच्या वस्तू खरेदी कराल. |
| वृश्चिक | संततीची विनाकारण चिंता सतावेल. मित्रमंडळींकडून लाभ. मात्र आहारी जाणे टाळा. चुका टाळा. |
| धनु | शत्रूंवर विजय मिळवाल. ऐहि सुखोपभोगाचा आनंद लाभेल. अनामिक भीती दूर ठेवा. |
| मकर | कष्टाचे चांगले फळ मिळेल. शत्रू माघार घेतील. घरातील सदस्यांचा राग ओढवून घेऊ नका. |
| कुंभ | जिद्द व चिकाटीने यश खेचून आणाल. जोडीदाराच्या नातलगांकडून लाभ. संततीच्या शिक्षणासंबंधी चिंता दूर होईल. |
| मीन | अवाजवी खर्चावर नियंत्रण ठेवा. कामात व्यस्त राहाल. पायाला जपा. जोडीदाराची भूमिका सहकार्याची राहील. |

**फॉर्म बी**
**जाहिर घोषणा**
(इन्सॉल्व्हन्सी अॅण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) रेग्युलेशन्स, २०१६ चे नियम १२ अन्वये)
**स्किमा एंटरप्रायजेस प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| क्र. | तपशिल | वर्णन |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **स्किमा एंटरप्रायजेस प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | ३०.१०.२००८ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | सहकार मंत्रालय, कंपनी निबंधक - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्रमांक /मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U51909MH2008PTC187854 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचे (काही असल्यास) पत्ता | नोंदणीकृत कार्यालय : सोहम हाऊस, हरी ओम नगर, पूर्व द्रूतगती महामार्गाजवळ, मुलुंड (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००८१. |
| ६ | अपतदारी ठराव प्रक्रिया समाप्ती तारीख | १३.१२.२०२४ |
| ७ | कॉर्पोरेट ऋणकोंची परिसमापन प्रारंभ तारीख | १३.१२.२०२४ (आदेश प्राप्त दि. १७.१२.२०२४) |
| ८ | परिसमापक म्हणून कार्यरत अपतदारी अधिकाऱ्याचे नाव व नोंदणी क्रमांक | **अरूण कपूर** आयबीबीआय नोंदणी क्र. IBBI/IPA-003/IP-N00030/2017-2018/10230 |
| ९ | मंडळासह नोंदणीकृत प्रमाणे परिसमापकाचे पत्ता व ई-मेल | **आयबीबीआय नोंदणीकृत पत्ताः** जी-६०१, आर्मी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, सेक्टर-०९, नेरूळ (पूर्व), नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०६. **नोंद. ई-मेल आयडीः** arun.kapoor58@yahoo.in |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचे पत्ता व ई-मेल | **पत्ताः** अरूण कपूर द्वारा - अॅनकोरा रिझोल्यूशन - १४१२, १४वा मजला, रियल टेक पार्क, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३ ईमेल: liq.schema@ancoraa.com |
| ११ | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | १६.०१.२०२५ |

येथे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ-३ ने **आदेश क्र. सी.पी. (आयबी) ३४४२/एमबी/२०१९ च्या बाबतीत आय.ए.क्र.५६५/२०२३ मध्ये दि. १३.१२.२०२४ रोजी (आदेश प्राप्त दिनांक १७.१२.२०२४ ) द्वारे स्कीमा एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेड**चे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
**स्कीमा एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना १६.०१.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी पुराव्यासह त्यांचे दावे **बाब क्रमांक १० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर** परिसमापकाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात. दाव्यांचा खोटा किंवा दिशाभूल करणारा पुरावा सादर केल्यास दंड आकारला जाईल.
परिसमापन प्रक्रियेदरम्यान भागधारक आपले दावे सादर करत नसल्यास, इन्सॉल्व्हन्सी अॅण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ अंतर्गत कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेदरम्यान अशा भागधारकाने सादर केलेले दावे कलम ३८ अंतर्गत सादर केले गेले आहेत असे मानले जाईल.
दिनांक : १७ डिसेंबर २०२४
ठिकाण: मुंबई
सही/-
**अरुण कपूर**
परिसमापक
IBBI / IPA-003 / IP-N00030 / 2017-2018 /10230
स्कीमा एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेडच्या परिसमापनाच्या बाबतीत
असाइनमेंटसाठी अधिकृतता: ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वैध

**मध्य रेल्वे**
**मुंबई विभाग**
**खुली ई-निविदा सूचना क्र. CR-DRM(W)BB-2024-30 of 16.12.2024**

**अ.क्र. १.** कामाचे नावः एसएसई पी.वे(डब्ल्यू) केवायएन अंतर्गत दिवा येथे क्षतीग्रस्त रस्त्याचा पृष्ठभाग पुन्हा बांधणे. अदमासे मूल्य रु. ४.९९ लाख, ईएमडी रु. १००००, पूर्तता कालावधी - २ महिने.
**अ.क्र. २.** कामाचे नावः कोपर-डोंबिवली दरम्यान किमी ४७/५००-६०० येथे डीएफसीसीआयएल मार्गाचे उल्लंघन करणाऱ्या विद्यमान ओव्हरहेड ६०० मिमी व्यासाच्या केडीएमसी मलनिःसारण वाहिनी पाईप लाईनच्या जागी प्रस्तावित मायक्रो टनलिंग पद्धतीद्वारे रेल्वे ट्रॅकखालून ओलांडून जाणारी १२०० मिमी व्यासाची आरसीसी एसपीएल एनपी ४ क्लास केसिंग पाईप बसविण्याकरिता उर्वरित काम. अदमासे मूल्य रु. १५९.५६ लाख, ईएमडी रु. २२९८००, पूर्तता कालावधी - ८ महिने.
**अ.क्र. ३.** कामाचे नावः अ) कल्याण - एसएसई(डब्ल्यू)केवायएन अंतर्गत ओएचई स्टोअर कल्याण जवळील जीआरपी कार्यालय आरओबीपासून क्षतीग्रस्त रस्त्याची (१२०० मिमी व्यासाचा आरसीसी पाईप बसविल्यामुळे) दुरुस्ती. ब) वरिष्ठ विअभि (एनई) सीएसएमटी कार्यक्षेत्राअंतर्गत कल्याण-इगतपुरी दरम्यान विविध ठिकाणी सीमा भिंतींवर टफन मोल्डींग कम्पोझिट्स (टीएमसी) कचरा संरक्षण व्यवस्था. क) एडीईएन(एम)आयजीपी अंतर्गत सीॲण्डडब्ल्यू कार्यालय आणि स्टोअर रूमची दुरुस्ती. डी) वरि. विअभि/एनई कार्यक्षेत्राअंतर्गत उत्तर-पूर्व घाट अनुभागामध्ये टनेलच्या अंतर्गत पृष्ठभागाची सफाई आणि सफेदीकरण. ई) वरि. विअभि(एनई) सीएसएमटी कार्यक्षेत्राअंतर्गत कल्याण-इगतपुरी अनुभागादरम्यान विविध ठिकाणी टफन मोल्डींग कम्पोझिट्स (टीएमसी) ड्रेन कव्हर. अदमासे मूल्य रु. ६४५.८२ लाख, ईएमडी रु. ४७२९००, पूर्तता कालावधी - ८ महिने.
**अ.क्र. ४.** कामाचे नावः अ) पेण-थल मध्ये पूल क्र. ११५/३ च्या पाईल कॅप आणि धारण भिंतीचे मजबुतीकरण. ब) एडीईएन/पूर्व/पनवेल अंतर्गत पूल क्र. ८४/१ए (१३/१८.३) (पाताळगंगा नदी पूल) (२४ नग) आणि पूल क्र. १३१/२ए (७/१८.३) (अंबा नदी पूल) (१२ नग) च्या पेडेस्टलचे मजबुतीकरण. अदमासे मूल्य रु. ११६.९३ लाख, ईएमडी रु. २०८५००, पूर्तता कालावधी - ६ महिने.
**अ.क्र. ५.** कामाचे नावः कल्याण-लोणावळा अनुभागामध्ये गेज फेस लुब्रिकेटरच्या (४६ नग) तरतुदीकरिता शेड्युल. अदमासे मूल्य रु. ६८०.८३ लाख, ईएमडी रु. ४९०४००, पूर्तता कालावधी - ६० महिने.
**अ.क्र. ६.** कामाचे नावः बीपी-बधवार पार्कमध्ये मध्य रेल्वेच्या अधिकारी निवासस्थानांची दुरुस्ती आणि देखभाल. अदमासे मूल्य रु. २९६.४० लाख, ईएमडी रु. २९८२००, पूर्तता कालावधी - १२ महिने.
**अ.क्र. ७.** कामाचे नावः वरि. विअभि एनई अनुभागाअंतर्गत एसएसई.पी.वे आयजीपी अंतर्गत तितोली यार्डची सुधारणा. अदमासे मूल्य रु. १४१.८० लाख, ईएमडी रु. २२०९००, पूर्तता कालावधी - ८ महिने.
**अ.क्र. ८.** कामाचे नावः अ) इगतपुरी-कसाराः कसारा इगतपुरी घाट अनुभागामध्ये रॉक फॉल बॅरियरची तरतूद करून, इगतपुरी-कसारा अनुभागाच्या केआरएन १२६/१००-१२६/८०० डाऊन लाईन दरम्यान असुरक्षित कटींग संरक्षण उपाय. ब) कसारा-आटगावः ट्रॅक फॉर्मेशन ओएचई किमी ११३/४९-११२/१ची धूप करणाऱ्या मोठ्या प्रमाणातील पावसाच्या, वाहिन्यातील पाण्यापासून ओएमबी-केई अनुभागामध्ये ट्रॅक फॉर्मेशनचे संरक्षण. अदमासे मूल्य रु. १७३८.८० लाख, ईएमडी रु. १०१९४००, पूर्तता कालावधी - १० महिने.
**अ.क्र. ९.** कामाचे नावः अ) आसनगाव-इगतपुरीः आरआरसी बॉक्स (७ नग दगड, ३ नग रेल टॉप आणि २ नग छोटे पाईप कल्व्हर्ट)द्वारे छोटे दगड टॉप/रेल टॉप आणि छोटे ह्युम पाईप कल्व्हर्ट्स बदलणे. ब) कल्याण-इगतपुरीमध्ये किमी ७८/३-५ प्रमुख पूल आणि पूल ७३/२ (आयआरपीएसएम आयडी-०१.०२.३२.२४.३.५१.००५) येथे शर्मल नाला येथे वॉटरवे रुंदीकरण आणि आरसीसी बॉक्स समाविष्ट करणे याद्वारे संरक्षण कामे आणि रिव्हर ट्रेनिंग. अदमासे मूल्य रु. १७८०.७८ लाख, ईएमडी रु. १०४०४००, पूर्तता कालावधी - १० महिने.
**अ.क्र.१०.** कामाचे नावः अ) एडीईएन टी कल्याण अंतर्गत एसएसई(पी/वे)एनआरएल अनुभागाकरिता विविध पी.वे कामाच्या कामाकरिता शेड्यूल. ब) एनआरएल-एमएई एडीईएन टी कल्याण अंतर्गत एसएसई (पी/वे) एनजी एनआरएल अनुभागाकरिता विविध पी.वे कामाच्या कामाकरिता शेड्यूल. क) एडीईएन टी केवायएन अंतर्गत एसएसई (पी/वे) एनआरएल अनुभागाकरिता सॅण्ड हम्प्सच्या मानकीकरणाचे शेड्यूल. ड) वर्ष २०२४-२५ करिता एडीईएन एन एलएनएल अंतर्गत एसएसई (पी)/वे) केजेटी अनुभागाकरिता विविध पी.वे कामाकरिता शेड्यूल. ई) खंडाळा येथे टीटीआरओएफ १ इन १६ १६ टर्नआऊट पॉईंट क्र. १०८-I आणि १०८-II करिता शेड्यूल. फ) एडीईएन एन एलएनएल अंतर्गत एसएसई(पी/वे)केजेटी/एलएनएल अनुभागाकरिता सॅण्ड हम्प्स (६ नग)च्या मानकीकरणाकरिता शेड्यूल. ग) एडीईएन एन एलएनएल अंतर्गत नागरी नियमांनुसार ट्रॅकमधून मोठ्या प्रमाणात चिंध्या उचलणे आणि कचऱ्याची विल्हेवाट लावणे. अदमासे मूल्य रु. ६९७.३६ लाख, ईएमडी रु. ४९८७००, पूर्तता कालावधी - १२ महिने.
I) उपरोल्लेखित निविदेचा निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळः अ. क्र. १ दि. ३१.१२.२०२४ रोजी, अ. क्र. २ दि. ०२.०१.२०२५ रोजी, अ. क्र. ३ आणि ६ दि. ०६.०१.२०२५ रोजी, अ. क्र. ४ आणि ५ दि. ०३.०१.२०२५ रोजी आणि अ. क्र. ७ आणि ८ दि. १०.०१.२०२५ रोजी ११.०० वाजेपर्यंत आणि अ. क्र. ९ दि. १७.०१.२०२५ आणि अ. क्र. १० दि. ०७.०१.२०२५ रोजी ११.०० वाजेनंतर उघडण्यात येतील. II) संभाव्य भागधारकांना विनंती आहे की, निविदेचे तपशील आणि शुद्धीपत्रक, जर असल्यास करिता त्यांनी वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. III) निविदाकार वरील ई-निविदेमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने फक्त वेबसाईट www.ireps.gov.in द्वारेच सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेकरिता व्यक्तिशः प्रस्तावांचे सादरीकरण करता येणार नाही. जर व्यक्तिशः सादरीकरण केल्यास, ते उघडण्यात येणार नाही तसेच विचारातही घेण्यात येणार नाही. IV) बोली सुरक्षा एकतर ई-पेमेन्ट गेटवेद्वारे रोखीत भरावी किंवा शेड्यूल्ड कमर्शियल बॅंक ऑफ इंडियाकडून बॅंक गॅरंटी बॉण्डद्वारे किंवा निविदा दस्तऐवजामध्ये उल्लेखिल्यानुसार भरावी. V) अधिक चौकशीकरिता, कृपयाः विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मध्य रेल्वे यांना दूरध्वनी ०२२-६७४५५३२३ येथे संपर्क साधावा. VI) सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश २०१७ दिनांक १६.९.२०१७ चे अनुपालन करते. निविदेचे संपूर्ण तपशील वेबसाईट www.ireps.gov.in येथे उपलब्ध आहेत.निविदेचे संपूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) कार्यालय, मुंबई सीएसएमटी यांच्या "सूचना फलकावर" देखील उपलब्ध आहेत.
विरेव्य (का) मुंबई सीएसएमटी
SUN 619 अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे